महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३२४ वा | दिनांक : ०६/११/२०२५ | वार : गुरूवार

## महाराष्ट्र सरकारचा इलॉन मस्कच्या स्टारलिंकशी करार : ग्रामीण भागात मिळणार गतिमान इंटरनेट सेवा



जागतिक उद्योजक इलॉन मस्क यांच्या मालकीच्या स्टारलिंक सॅटेलाईट कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीसोबत महाराष्ट्र सरकारने महत्त्वाचा सामंजस्य करार केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभाग आणि स्टारलिंक यांच्यातील या करारामुळे राज्यात अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध होणार असून, राज्यातील दुर्गम आणि अल्पसेवित भागांपर्यंत उपग्रहाधारित इंटरनेट सेवा पोहोचवण्याची दिशा स्पष्ट झाली आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. या कराराची अंमलबजावणी होण्यापूर्वी स्टारलिंक कंपनीला केंद्राच्या दूरसंचार विभागाकडून आवश्यक नियामक आणि अनुपालन परवानग्या मिळणे बंधनकारक असेल, असेही राज्य सरकारने स्पष्ट केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्टारलिंकच्या उपाध्यक्ष लॉरेन ड्रेयर आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव विरेंद्र सिंह यांनी स्वाक्षरी केली. या करारामुळे स्टारलिंकसोबत औपचारिक भागीदारी करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य ठरले आहे.

याबद्दल बोलताना फडणवीस यांनी विश्वास व्यक्त केला की, स्टारलिंक महाराष्ट्राशी भागीदारी करत असल्याने आपण राज्यातील शेवटच्या गावापर्यंत डिजिटल दरी मिटवत आहोत. कितीही दुर्गम असले तरी, प्रत्येक शाळा, प्रत्येक आरोग्य केंद्र आणि प्रत्येक गाव आता डिजिटल संपर्कात येणार आहे.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, ही भागीदारी 'फ्युचर-रेडी' आणि पूर्णपणे जोडलेले महाराष्ट्र घडवण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. भारतातील पहिले राज्य म्हणून ही भागीदारी सुरू करताना आम्हाला अभिमान वाटत आहे. ग्रामीण स्तरावर 'डिजिटल इंडिया'चे हे एक आदर्श मॉडेल ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. स्टारलिंकच्या उपाध्यक्षा लॉरेन ड्रेयर म्हणाले, आमचे ध्येय म्हणजे कुठेही, कोणत्याही पार्श्वभूमीतील लोकांना उच्च गतीची इंटरनेट सेवा उपलब्ध करून देणे. त्यामुळे महाराष्ट्र शासनासोबत या ऐतिहासिक सहकार्याचा भाग होणे आमच्यासाठी सन्मानाची गोष्ट आहे. स्टारलिंकचे ध्येय म्हणजे पारंपरिक पायाभूत सुविधांपासून वंचित राहिलेल्या लोकांना डिजिटल विश्वात सामील करणे. महाराष्ट्राचे समावेशक आणि लवचिक डिजिटल विकासाचे दृष्टीकोन आमच्याशी पूर्णपणे सुसंगत आहे. एकत्र येऊन आपण उपग्रह इंटरनेटद्वारे शिक्षण, आरोग्य सेवा आणि ग्रामीण समुदायांना सक्षम बनविण्याचे उदाहरण घालू, असे त्यांनी म्हटले.

या महत्त्वपूर्ण भागीदारीच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन संस्था, ग्रामीण समुदाय तसेच महत्त्वाच्या सार्वजनिक पायाभूत सुविधांसाठी उपग्रहाधारित इंटरनेट सेवा उपलब्ध करून देणार आहे. ही सेवा भारत सरकारकडून मिळणाऱ्या नियामक व कायदेशीर मंजुरींवर आधारित असेल. या धोरणात्मक सहकार्याअंतर्गत, महाराष्ट्र शासन आणि स्टारलिंक अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने राज्यातील दुर्गम व अल्पसेवित भागांना जोडण्यासाठी कार्य करतील. यात प्रामुख्याने आदिवासी शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आपत्ती नियंत्रण कक्ष, वन चौक्या, किनारी क्षेत्रे, तसेच गडचिरोली, नंदुरबार, धाराशिव आणि वाशिम या जिल्ह्यांचा समावेश असणार आहे.

या उपक्रमाचा उद्देश केवळ दुर्गम भागांना जोडणे हा नसून, राज्यातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा मार्गांवरही उपग्रहाधारित कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देणे आहे. यात समृद्धी महामार्ग, फेरी सेवा, बंदरे, किनारी पोलीस नेटवर्क यांचा समावेश असेल. याव्यतिरिक्त, शिक्षण आणि टेलिमेडिसिन क्षेत्रातही स्मार्ट कनेक्टिव्हिटीचा लाभ देण्याची व्यापक योजना आखली आहे. या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठी एक संयुक्त कार्यगट स्थापन करण्यात येणार आहे.

हा उपक्रम ९० दिवसांच्या प्रायोगिक टप्प्यामध्ये तीन टप्प्यांमध्ये (३०, ६० आणि ९० दिवस) पूर्ण केला जाईल. या प्रगतीचा आढावा दर तीन महिन्यांनी थेट मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली घेतला जाणार आहे. महाराष्ट्र-स्टारलिंक सहकार्यामुळे राज्याच्या महत्त्वाकांक्षी 'डिजिटल महाराष्ट्र' मिशनला अधिक गती मिळणार आहे. शिवाय, हे उपक्रम राज्यातील ईव्ही, किनारी विकास आणि आपत्ती प्रतिकारशक्ती कार्यक्रमांशी सुसंगतपणे एकत्रित केले जाणार आहेत.

## मुलगी ठाकरे गटाकडून नगराध्यक्षपदासाठी इच्छुक : वडिलांचा भाजपाला राजीनामा





**मुंबई** : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता जाहीर करण्यात आले आहेत. नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांची घोषणा राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषदेतून केला आहे. पुढील महिन्यात या निवडणुका रंगणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांची आता चांगलीच धावपळ सुरु झाली आहे. त्यातच रत्नागिरी येथील भाजपच्या जिल्हाध्यक्षांनी तडकाफडकी राजीनामा दिल्याचे समोर आले आहे.

रत्नागिरी येथील भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेश सावंत यांनी आपल्या जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. चिपळूण येथे भाजपच्या एका कार्यक्रमात त्यांनी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे आपला राजीनामा दिला. त्यामुळे येथील राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. तसेच आपल्या लेकीसाठी राजेश सावंत यांनी हा निर्णय घेतला असल्याचे बोलले जात आहे. सावंत यांच्या मुलीला शिवसेना ठाकरे गटाकडून नगराध्यक्ष पदाची उमेदवारी मिळणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळेच राजेश सावंत यांनी राजीनामा दिल्या असल्याची रत्नागिरीत चर्चा सुरू आहे.

राजेश सावंत यांची मुलगी शिवानी माने ही शिवसेना ठाकरे गटाचे नेते बाळ माने यांची सून आहे. नगरपालिका निवडणुकांमध्ये नगराध्यक्ष पदासाठी शिवानी माने इच्छुक असल्याचे समजते. त्यामुळे लेकीसाठी वडिलांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याची चर्चा सुरू आहे. राजेश सावंत आणि बाळ माने हे व्याही असून विधानसभा निवडणुकीच्यावेळी सावंत यांनी माने यांना मतदानासाठी मदत केल्याची देखील चर्चा होती.

दरम्यान, राजेश सावंत यांचा राजीनामा रवींद्र चव्हाण यांनी स्वीकारला. यावेळी ते म्हणाले, राजेश सावंत हे चांगले कार्यकर्ते आहेत पण ते सध्या अडचणीत आले. त्यांच्या मुलीचे लग्न झाले आहे, ती सध्या रत्नागिरीतील नगराध्यक्षपदासाठी इच्छुक आहे. त्यामुळे, पक्षाचे काम करताना कुठेही अडचण नको, याचमुळे राजेश सावंत यांनी राजीनामा दिला. त्यांचा राजीनामा मला मिळाला असून मी आणि वरिष्ठ यावरती विचार करू आणि निर्णय घेऊ, अशी प्रतिक्रिया चव्हाण यांनी दिली आहे.

## ही निवडणूक लोकशाहीला अनुसरून नाही : आयोग कोणाच्या दबावाखाली काम करत आहे? - संदीप देशपांडे



**मुंबई** : राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या (एकूण २८८) सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान; तर ३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी होणार असल्याने या सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या कार्यक्षेत्रात आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत केली. यावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी टीका केली आहे. तर आज मनसे नेते संदीप देशपांडे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयावर आक्षेप घेतला आहे.

संदीप देशपांडे म्हणाले, मुळात ज्या पद्धतीने निवडणुका घोषित करण्याचा डाव निवडणूक आयोगाने साधला हे चुकीचे आहे. आम्ही त्यांना वारंवार एवढे पुरावे दिले त्यांना वारंवार दाखवले की कशा पद्धतीने बोगस मतदान सुरू आहे. दुबार मतदान होत आहे. तरी सुद्धा कोणाच्या दबावाखाली निवडणूक आयोग काम करत आहे? असा सवाल देशपांडेंनी उपस्थित केला.

पुढे बोलताना संदीप देशपांडे म्हणाले, दुबार मतदारांच्या नावापुढे डबल स्टार करणार असे ते म्हणाले, पण त्यांना तुम्ही रोखणार कसे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यापेक्षा दुबार जर तुम्ही ओळखले तर त्यांचे नाव कट करायला पाहिजे. ते कट न करता त्यांना मतदान करायला देणार आहात, हे कुठल्या लोकशाहीत बसते?

जे मतदार बोगस आहेत, म्हणजे एकेका घरावर ५०-१० मतदारांची नोंदणी झाली आहे. त्या मतदारांवर कोणता स्टार लावणार आहेत, यावर निवडणूक आयोगाने कोणतेही उत्तर दिले नाही. त्यामुळे ही जी निवडणूक आहे, ती लोकशाहीला अनुसरून नाही. त्यामुळे आम्ही याचा तीव्र निषेध करतो. या फसव्या निवडणुका होण्याची शक्यता जास्त वाटते, असे संदीप देशपांडे म्हणाले. पुढे बोलताना संदीप देशपांडे म्हणाले, आम्ही काय सांगितले होते की निवडणुका पारदर्शकपणे होणे हे निवडणूक आयोगाची जिम्मेदारी आहे. दुबार मतदारांसाठी स्टार देणार आणि त्यांच्याकडून लिहून घेणार की मी दुसरीकडे मतदान करणार नाही. तरी त्यांनी मतदान केलेच तर त्यासाठी कोणती यंत्रणा आहे का? याचे उत्तर मिळाले नाही. तसेच जे बोगस मतदार आहेत, त्यांचे काय करणार, याचे सुद्धा आयोगाने उत्तर दिलेले नाही. सुप्रीम कोर्टाने असे कधीही सांगितले नाही की सदोष मतदार यादी असताना सुद्धा निवडणुका घ्या. यावर आता जे काही कायदेशीर कारवाई करायची आहे त्याचा निर्णय वरिष्ठ घेतील. तसेच जिथे जिथे चुकीचे मतदान होत असेल तिथे जे आमच्या राज साहेबांनी सांगितले आहे त्यानुसार आमचे महाराष्ट्र सैनिक ट्रीटमेंट देण्याचे काम करतील हे निवडणूक आयोगाने लक्षात ठेवावे, असे म्हणत संदीप देशपांडे यांनी निवडणूक आयोगाला इशारा दिला आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०६ नोव्हेंबर २०२५

# दरोड्याच्या तयारीत असलेले दरोडेखोर सिनेस्टाइल जेरबंद



**कन्नड (अरुण थोरात) :** दि. ०४ नोव्हेंबर रोजी स्था. गु. शा. पथका सह पोलीसांनी अवैध धंद्यावर कारवाई करून परत छ. संभाजीनगर येथे येत असताना, माहीती मिळाली की, वैजापूर येथे दि. ०४ नोव्हेंबर रोजी अंदाजे २०.३० वाजेच्या सुमारास एस बी आय बँक शाखा मोंढा मार्केट समोर हरियाणा राज्याच्या पासींगची संशयित पाढ-या रंगाची मारुती सुझुकी स्वीफ्ट कार क्र. HR ९३ B ६५५७ मध्ये काही इसम संशयास्पद रित्या थांबून असल्याचे माहिती वरून पोस्टे वैजापुर येथील अधिकारी व अंमलदार यांनी पाठलाग करून सदर कार जेजुरकर वस्ती येथे अडवली असता. त्या कारमधील संशयित इसम कार मधुन उतरून पळुन गेले आहे. अशी माहिती प्राप्त झाल्यावरुन पोलीस निरीक्षक सा. स्थानिक गुन्हे शाखा यांचे आदेशान्वये पथकासह पोलीस स्टेशन वैजापूर हद्दीत जाऊन पळून गेलेल्या संशयित इसमांचा तिडी, मकरमतपुर शिवारात शोध घेतला असता, दि. ०५ नोव्हेंबर रोजी ००.३० वाजता मौजे तिडी गावात जिल्हा परिषद शाळे जवळ दोन इसम संशयित रित्या दिसुन आल्याने पोलीस सदरील इसमाजवळ जाताच त्यांना पोलीसांची चाहुल आल्याने सदर इसम पळुन जात असतांना. त्यांचा पाठलाग करुन सदर इसमांना ताब्यात घेऊन त्यांचे नाव गाव विचारता, त्यांनी त्यांचे नाव मोहमंद कैफ नजमोद्दीन (वय २१वर्ष) रा. उलेटा ता. फिरोजपुर जि नुहु राज्य हरियाणा, आझाद इमरु खान (वय २४ वर्षे) रा. झारोकशी ता पुनहना जि नुहु राज्य हरियाणा असे सांगुन सदर कार क्र HR ९३ B ६५५७ ही आमचीच असल्याचे सांगुन त्यांच्या सोबतचे कारमध्ये इतर तीन साथीदार पळुन गेल्याचे सांगितल्याने त्यांना पोलीस स्टेशन वैजापुर येथे आणुन दोन पंच समक्ष त्यांची अंगझडती व त्यांच्या स्वीफ्ट कारची झडती घेतली असता. त्यांच्या ताब्यातुन एक स्वीफ्ट कंपनीची पांढ-या रंगाची गाडी क्र. HR ९३ B ६५५७, एक काळा स्प्रे, एक हातोडी, एक गुप्ती, एक सुरी, एक बॅटरी, एक रस्सी, एक स्क्रू ड्रायव्हर, दोन काळ्या रंगाच्या पट्ट्या, एकुण ८ एटीएम कार्ड, ३ मोबाईल व नगदी २२,००० रु. असा एकुण ४,८७,७५०.०० रु. चा मुद्देमाल दरोड्याची साहित्यासह दरोडा टाकण्याच्या तयारीत असताना मिळून आल्याने त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन वैजापूर येथे गुरनं ६३३/२०२५ कलम ३१०(४),(५) BNS प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सदरील कार्यवाही जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. विनय राठोड यांच्या आदेशाने स्था. गु. शाखा छत्रपती सभांजीनगर ग्रामीण, पोलीस निरीक्षक विजयसींग राजपुत यांच्या मार्गदर्शक सुचना वरुन स्थागुशा. पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे पो. हे. कॉ. कासीम पटेल, सचीन राठोड, पो. अं. पाटील व बहुरे यांनी सदर घटनेतील दोन आरोपी पकडुन त्यांना वैजापुर पोलीस यांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

## सरकारी जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्याला सदस्य राहण्याचा अधिकार नाही!

**बुलढाणा (महेश मुंढे) :** सिंदखेड राजा तालुक्यातील किनगाव राजा ग्रामपंचायतीत मोठी खळबळ उडवणारा निकाल जाहीर झाला असून ग्रामपंचायत सदस्या विदया दिपक साळवे यांना शासकीय जमिनीवर अतिक्रमण केल्याच्या आरोपावरून अपर जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी अपात्र घोषित केले आहे! महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १४ (१)(ज-३) अंतर्गत हा निर्णय देण्यात आला असून, या आदेशामुळे ग्रामपंचायतीत आणि स्थानिक राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ माजली आहे.प्रकरणाचा उगम - “सरकारी जागेवर अतिक्रमण”अर्जदार विठोबा कुंडलीक चवरे (रा. किनगाव राजा) यांनी दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, सदस्या विदया साळवे या त्यांच्या पती आणि कुटुंबासह राहत असून त्यांच्या पतीने शासकीय मालमत्ता क्र. ५४ वर २०x३० फूट क्षेत्रावर बेकायदेशीर अतिक्रमण करून बांधकाम केले आहे.सदर जागेचा कर देखील दिपक तोताराम साळवे यांनी भरल्याचे रेकॉर्डवर असल्याने, सदस्या या अप्रत्यक्षपणे अतिक्रमणाचा लाभ घेत आहेत आणि त्यामुळे त्या ग्रामपंचायत अधिनियमाचे उल्लंघन करीत आहेत, असे अर्जदाराने नमूद केले.बचावाचा प्रयत्न पण उपयोग नाही!गैरअर्जदार विदया साळवे यांनी मात्र या आरोपांना फेटाळून लावत, आपण मालमत्ता क्र. १४२८ वर राहत असल्याचा दावा केला. त्यांनी ही तक्रार राजकीय द्वेषातून दाखल करण्यात आली असल्याचा आरोप केला. मात्र, दाखल केलेल्या ग्रामपंचायत नोंदींमध्ये मालमत्ता क्र. ५४ ही सरकारी जागा असून भोगवटदार म्हणून दिपक साळवे यांचे नाव कायम असल्याचे आढळून आले.प्रकरणातील दाखले तपासल्यानंतर अपर जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की —"गैरअर्जदार विदया साळवे या आपल्या पतीसह एकत्र कुटुंबात राहतात. त्यांच्या पतीने शासकीय जमिनीवर अतिक्रमण केले असून त्या स्वतः त्या जागेचा लाभ घेत आहेत. त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम १४(१)(ज-३) चे उल्लंघन केले आहे.”या सर्व बाबींचा विचार करून अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ रोजी विदया साळवे यांना ग्रामपंचायत सदस्यपदासाठी अनर्ह (अपात्र) ठरवले.तसेच आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात आले की, शासकीय जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्ती किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना ग्रामपंचायत सदस्य राहण्याचा कोणताही अधिकार नाही.या आदेशानंतर किनगाव राजा ग्रामपंचायतीत तसेच सिंदखेडराजा तालुक्यात मोठी चर्चा रंगली आहे. विदया साळवे या सत्ताधारी गटातील महत्त्वाच्या सदस्यांपैकी असल्याने हा निर्णय स्थानिक पातळीवर राजकीय समीकरणांवर परिणाम करणारा ठरणार आहे.

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०६ नोव्हेंबर २०२५

## शिवाजी काशिनाथ गायकवाड यांना इतिहास विषयात पीएच.डी. पदवी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** मूळ दरेगावचे भूमिपुत्र व हल्ली मुक्काम कर्मभूमी मिटमिटा येथील इतिहास अभ्यासक सामान्य कुटुंबातील युवक शिवाजी काशिनाथ गायकवाड यांना भारताच्या शिक्षण क्षेत्रातील सर्वात शेवटची डिग्री पीएचडी प्रदान. दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५, शुक्रवारी दुपारी ३:३० ते ४:३० या वेळेत आभासी पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर मानव्यविद्या शाखेंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचास्पती (पीएच.डी.)पदवी करिता सादर केलेल्या प्रबंधाची मौखिक परीक्षा संशोधक विध्यार्थी म्हणून शिवाजी गायकवाड, (इतिहास) यांनी दिली.संशोधक मार्गदर्शक म्हणून डॉ.कृष्णा मालकर इतिहास विभागप्रमुख श्री आसारामजी भांडवलदार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देवगांव (रं), ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर यांनी "संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील लोकलढा आणि वृत्तपत्रे : एक चिकित्सक अभ्यास"या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले.यासाठी बहिस्थ परीक्षक म्हणून प्रा.डॉ.आर.आर.मुटकुळे यांनी तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभागाच्या विभागप्रमुख डॉ.गीतांजली बोराडे यांच्या अध्यक्षतेखाली ही खुली मौखिक परीक्षा संपन्न झाली.त्यात त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पी एचडी) पदवी प्रदान करण्याची शिफारस करण्यात आली. सदर संशोधनात त्यांनी संयुक्त महाराष्ट्र घडविण्यासाठी जनआंदोलनाने, राजकीय अनास्थाचे परिणाम व सामाजिक, वर्ग,संघर्ष उद्योग, व्यापार साहित्य, कला,क्रीडा, आरोग्य, वृत्तपत्रे यांचे महत्व आणि परिणाम यावर भर दिला आहे. त्यामुळे प्रस्थापित राजकीय घडामोडी, राज्यराज्यातील सीमा प्रश्न, संघर्ष सोडवण्यासाठी त्यात शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.याचा फायदा भारतातील विविध राज्यांतर्गत निर्माण होणारे सामाजिक,भाषिक, व्यावसायिक, वांशीक भेद -संघर्ष सीमा प्रश्न-वाद-विवाद सोडविण्यासाठी या संशोधनाचा समाजाला निश्चित उपयोग होऊ शकतो.आणि राज्यात उद्योग व्यवसायातून राज्ये आपला सर्वांगीन विकासात पुढे जाऊ शकतात असे त्यांनी आपल्या संशोधनात विषय मांडलेला दिसून येतो. आज भारतात विविध राज्यात जसे मणिपूर -कूकी, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वाद, नेपाळ-भारत सीमा प्रश्न, गुजरात-डांग-महाराष्ट्र सीमा प्रश्न असे विविध प्रश्नावर मार्ग या संशोधनातून निघू शकतो असे त्यांनी सांगितले. या परीक्षेतील यशाबद्दल त्यांचा सत्कार भारतीय जनता पार्टी चे दिपक बनकर यांच्या हस्ते त्यांच्या घरी जाऊन करण्यात आला यावेळी पडेगाव मिटमिटा येथील तरुण कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# पिशोर येथे तेहतीस वर्षांनंतर मित्रमैत्रिणींचा स्नेहमेळावा



**कन्नड (अरुण थोरात) :** क्षण सोनेरी आठवणींच्या, शाळेच्या दारी भेटलो पुन्हा, वाटलं काळ थांबला जणू, पुन्हा बालहोत चाललो आम्हीना...या उक्तीप्रमाणे काळ बदलला, चेहरे बदलले, जबाबदाऱ्या वाढल्या; पण शालेय मैत्रीचं नातं तसूभरही बदललं नाही. अगदी याच भावनेने १९९२-९३ साली दहावी उत्तीर्ण झालेले पिशोर येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयाचे विद्यार्थी तब्बल ३३ वर्षांनंतर पुन्हा एकवटले आणि जुने दिवस आठवत एक अविस्मरणीय स्नेहमेळावा साजरा केला. ज्या शाळेत बालपण साकारले, जे प्रांगण खेळण्यांनी, आनंदाने भरून गेलं, त्याच जागी पुन्हा जमल्यावर आनंद, उत्साह, ओलावा आणि हुरहुर अशा अनेक भावना मनात दाटून आल्या. वर्गखोल्या, शाळेचे मैदान आणि त्या काळच्या खोडकर व निरागस आठवणींनी सर्वांना भूतकाळात नेले. प्रत्येक क्षण हास्य उत्साह आणि मैत्रीने भारवलेला होता.कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित तत्कालीन सर्व शिक्षक गुरुजनांचा सन्मान करण्यात आला. शिक्षकांप्रती कृतज्ञता आणि आदर व्यक्त करत विद्यार्थ्यांनी शाळेला भेटवस्तूही सुपूर्द केली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान एन. आर. नवले होते. प्रमुख अतिथी म्हणून क.रा. नवले गुरुजी, एम.एच. सुर्वे, श्रीमती एन.एम. सुर्वे , ए.बी. जाधव, यू.एल. नवले, पी.एम. डहाके, एन.ए. जाधव, एस.एस. गवई, डी.डी. निळ , व्ही.पी. मोकासे , जे.टी. मोकासे आबा, ए.के. मोकासे , पी.एस. जाधव , श्रीमती ए.के. नवले, के.एम. हळदे आदी शिक्षक उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी जीवनप्रवासातील आठवणी सांगत आपापली मनोगते व्यक्त केली. व्यापारी, डॉक्टर, अधिकारी, शिक्षक, राजकीय पदाधिकारी, शेतकरी, व्यावसायिक अशा विविध क्षेत्रात स्थिरावलेल्या मित्रमैत्रिणींनी परस्परांची विचारपूस केली. दरम्यान, भूतकाळात डोकावत आज पुन्हा बालपणाचा, मैत्रीचा क्षण अनुभवायला मिळाला आयुष्यातील हा दिवस प्रत्येकाच्या मनाच्या कोपऱ्यात घर करून राहील या भावनेने सर्वांनी निरोप घेतला. कार्यक्रमासाठी विजय पाटील, लक्ष्मण नवले, विनोद कुमार शिंदे, प्रशांत नवले यांच्यासह स्थानिक मित्रानी विशेष परिश्रम घेतले. प्रशांत नवले यांच्या सूत्रसंचलणाने रंगत वाढली. कार्यक्रमाच्या शेवटी पुन्हा भेटू या अशा निर्धाराने आणि मनात अनंत आठवणींचा खजिना घेऊन सर्वांनी एकमेकांना निरोप दिला.आभार किरण सुर्वे यांनी मानले.






# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०६ नोव्हेंबर २०२५


## तिफण लोकवाद्ये विशेषांकाच्या निमित्ताने...




**प्रिय** साहित्यिक, रसिक वाचक मित्रहो, दिपावली म्हणजे दिपोत्सव .. नवचैतन्याचा प्रेरणादायी असंख्य दिव्यांच्या प्रकाशाचा उत्सव.. या दिपावलीच्या पावन पर्वाच्या निमित्ताने त्रैमासिक तिफण दरवर्षी दिवाळी अंक प्रसिद्ध करीत आहे. तिफणचे बहुतांश अंक हे विशेषांक स्वरूपाचे असल्यामुळे तिफण दिवाळी अंक प्रसिद्ध करीत नसे. परंतु तिफणची सुरुवातच बलिप्रतिपदेच्या दिवशी झालेली आहे. त्यामुळे दिवाळी अंकाच्या क्षेत्रातही तिफण मागे राहू नये. त्यामुळे गेल्या तीन वर्षांपासून तिफणने दिवाळी अंक प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी नदी विशेषांक, झाडी पट्टी रंगभूमी विशेषांक आणि आता लोकवाद्ये विशेषांक दिवाळी अंक म्हणून प्रसिद्ध होत आहे. तिफणने विशेषांकाची एक परंपरा निर्माण केली. नाविण्यपूर्ण विषय आणि आशयपूर्ण अंक ही भूमिका दिवाळी अंकातही जपली आहे. संस्कृती व समाज जिवनाशी निगडित अनेक विषय तिफणने हाताळले आहे. लोकवाद्ये हा आपल्या लोक जिवनाचा एक अविभाज्य भाग आहे. लोकजिवन व लोकसंस्कृती चे जतन व संवर्धन लोकवाद्येच्या माध्यमातून लोक कलावंतानी प्रामाणिकपणे केले आहे. ही लोकवाद्ये आजही अत्यंत महत्वाची आहेत.भाषा, साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक तिफण हे सातत्याने नाविण्यपूर्ण विशेषांक प्रसिद्ध करीत असते. महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर विविध प्रकारची लोकवाद्ये वाजविली जातात.सण, उत्सव, यात्रा, लग्न प्रसंगी, मर्तिकाची, विविध देवदेवतेची, धर्माची तसेच जाती-जमातीची अशी अनेक पारंपरिक लोकवाद्ये आजही पहावयास मिळतात.ही लोकवाद्ये आजही आपले स्वतंत्र अस्तित्व व वेगळेपण जपून आहेत. ही लोकवाद्ये वाजविण्याची पद्धतही स्वतंत्र आहे. आजही ही लोकवाद्ये आपणास भूरळ पाडतात.प्रत्येक लोकवाद्याचे ताल, ध्वनी, सूर, हे भारावून टाकणारे असतात. या लोकवाद्यानी आपले सामाजिक व सांस्कृतिक जीवन व्यापले आहे. गावोगावी, वाडी वस्तीवर ही लोकवाद्ये वाजविणारी लोक कलावंत मंडळी आपणास पहावयास मिळतात. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीतही त्यांनी आपला हा लोकसांस्कृतिक वारसा जिवापाड जपला आहे, जोपासला आहे. मात्र हे लोकवाद्ये वाजविणारे लोक कलावंत व लोकवाद्ये ही उपेक्षितच राहिली. त्यांचा फारसा अभ्यास व संशोधन झाले नाही. तिफण अशा दुर्लक्षित विषयाच्या नेहमी शोधात असते. ग्रामीण भागात विविध सण, उत्सव, यात्रा, धार्मिक प्रसंगी लोकवाद्ये आपणास पहावयास व अनुभवावयास मिळतात. हा अनमोल ठेवा या सर्व लोककलावंतानी अजरामर करून ठेवला आहे. हा दखलपात्र व महत्वाचा विषय तिफणच्या अंकाचा विषय झाला पाहिजे.या सर्व लोकवाद्यांची एकत्रित माहिती उपलब्ध व्हावी, त्याचे संकलन होऊन त्यांचा अभ्यास व्हावा, तसेच ही लोकवाद्ये वाजविणारे लोक कलावंत (जे आजही दुर्लक्षितच आहेत) या सर्वांची दखल घेऊन ती समाजासमोर यावीत, त्यांच्या जतन व संवर्धनाला चालना मिळावी, या महत्वपूर्ण उद्देशाने त्रैमासिक तिफण तर्फे लोकवाद्ये विशेषांक प्रसिद्ध करण्यात येत आहे. तिफणने कधीकाळी केलेला हा संकल्प आज या विशेषांकाच्या निमित्ताने पुर्ण होत आहे. याचा मला संपादक म्हणून विशेष आनंद आहे.लोकवाद्याचा इतिहास, परंपरा, वाजविण्याचे कौशल्य, लोकवाद्ये वाजविणारे लोककलावंत, विशिष्ट प्रसंगी वाजविले जाणारे लोकवाद्य तसेच विविध जाती-जमातीची लोकवाद्ये, त्यांच्या मुलाखती, लोकवाद्यावरील कविता, कथा, ललित, रिपोर्ताज यासंबंधी सविस्तर माहिती असणारे लेखन या संदर्भात आवाहन केले. आमच्या आवाहनाला प्रतिसाद देवून महाराष्ट्राच्या विविध भागातून अनेक अभ्यासकांनी आपले लेख तिफणसाठी उपलब्ध करून दिले. लोकवाद्याचा शोध घेत असतांना अनेक लोकवाद्यांची नावे पुढे आली. मात्र सर्वच लोकवाद्यावर लेख आले नाही. तसा हा फार मोठा व व्यापक विषय आहे. महाराष्ट्रात विविध भागात आजही आढळणारी काही लोकवाद्ये ही पुढीलप्रमाणे आहेत.ताऱ्या, मांजरी, नंगोरा, तुडूम, कुंडीळ, डफरी, किंगरी, संबळ, दिमडी, सुंद्री, हलगी, ढोलकी, घुमट, मृदंग, टिपरी, तारपा, पावरी, सुंदरी, भेरी, घांगळी, बुलबुल, वीणा, डमरू, शंख, बासरी, घंटा, काशाची थाळी, नगारा, तुतारी, टाळ, बिगुल, पुंगी, सतार, खंजेरी, सनई, चिपळ्या, खुळखुळा, तुणतुणे, तबला, ढोल, डफ, ताशा, घुंगरू , एकतारी ईत्यादी. आजही या लोकवाद्याचा उपयोग आपल्या विविध कार्यक्रम प्रसंगी होतांना दिसतो. ही लोकवाद्ये आपल्या लोक जिवनाचा एक अविभाज्य भाग झालेली आहेत. गावोगावी ही लोकवाद्ये जपून ठेवलेली आहे. विभागनिहाय व विविध जाती जमातींची लोकवाद्ये ही निरनिराळी आहे. खरं पाहिलं तर हा विषय फारच दुर्लक्षित राहिला आहे. या सर्व लोकवाद्याचे संकलन, जतन व संवर्धन होण्यासाठी विविध संस्था, विद्यापीठे यांनी पुढे आले पाहिजे. लोकवाद्याची संग्राहलये उभी राहिली पाहिजे. तसेच ही सर्व लोकवाद्ये कशी व कुठे तयार होतात ती कोण तयार करतात याचाही शोध घेवून त्यांना प्रोत्साहन व आर्थिक मदत देवून या कौशल्यावर आधारित प्रशिक्षण केंद्रेही सुरू झाली पाहिजे. नविन शैक्षणित धोरणात अशा विषयांना अधिकच महत्व प्राप्त झाले आहे. तसेच ही लोकवाद्ये वाजविणाऱ्या लोक कलावंतांना वृद्ध कलावंत मानधन योजना लागू करून त्यांना भरघोष आर्थिक मदत मिळाली पाहिजे. ही लोकवाद्ये सर्वांनीच जपली पाहिजे, तो आपला अनमोल असा ठेवा आहे. तिफणच्या या लोकवाद्ये विशेषांकातून विविध प्रकारच्या लोकवाद्यावर प्रकाश टाकता आला. लोकवाद्याचा इतिहास, परंपरा व स्वरूप विशेष त्यांचे उपयोग व महत्व समजून घेता आले हे या अंकाचे फलितच आहे. या निमित्ताने तिफणने हा लोकसांस्कृतिक ठेवा आपल्या पर्यंत पोहचवून संस्कृती संवर्धनाच्या कार्यास हातभार लावला आहे. या अंकासाठी गेली अनेक दिवस आम्ही विविध अभ्यासक, लोककलावंत यांचा शोध घेवून लोकवाद्ये या विषयावर चर्चा करीत होतो. अनेकांना प्रत्यक्ष फोन करून त्यांना या विषयावर लिहायला भाग पाडले. हे सर्व मान्यवर अभ्यासक आमच्या या वाटचालीत दखलपात्र ठरून विशेष अभिनंदनास पात्र ठरले आहे. अनेक अभ्यासकांनी या नाविन्यपूर्ण विषयाच्या अनुषंगाने आपली शोधयात्रा पूर्ण करून आम्हास लेख उपलब्ध करून दिले . या निमित्ताने एका चांगल्या विषयाला न्याय देता आला हा आनंद आहेच. या अंकाच्या निमित्ताने पुन्हा अभ्यासक, संशोधक या विषयाकडे वळतील, त्यांचा अधिक अभ्यास व संशोधन करतील. असा आम्हास सार्थ विश्वास आहे. दिवाळी अंकाच्या परंपरेत तिफणचा हा लोकवाद्ये दिवाळी विशेषांक नक्कीच वाचकांच्या पसंतीस उतरेल असा आम्हास विश्वास आहे. या अंकासाठी प्रत्यक्षाप्रत्यक्ष मार्गदर्शन, मदत व सहकार्य करणारे सर्व मान्यवर यांचे आभार व्यक्त करतो. लेखक, वाचक, अभ्यासक या अंकाचे मनापासून स्वागत करतीलच हा आशावाद गैर नाही. आपले लोक जीवन समृद्ध करणाऱ्या या लोकवाद्यास व लोककलावंतास आपण खूप खूप जपलं पाहिजे. त्यांचा यथोचित सन्मान झाला पाहिजे. हा विशेषांक म्हणजे तिफणने केलेला एक प्रकारचा सन्मानच आहे. सर्वांनाच हा अंक उपयुक्त ठरणार आहे. आम्ही आपल्या अभिप्रायाच्या प्रतिक्षेत आहोत. या अंकाच्या निर्मितीसाठी विशेष सहकार्य करणारे आमचे स्नेही श्री मंदार नागरे यांनी या अंकाची सुरेख मांडणी केली आहे. त्यामुळे व आपल्या लेखनामुळे हा अंक संग्राहय व संदर्भमूल्य असणारा अंक ठरणार आहे. आपणा सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा !

**डॉ. शिवाजी हुसे**
**संपादक, तिफण**

## बाळया...

बाळ्या..
माझ्या कन्नडच्या भूमीत
मराठवाड्याच्या मातीत
तिफणच्या हिरव्यागार रानात
अन् गौताळयाच्या वनात
तु जन्मलास.. बहुरंगी लेखणीतून
जन्मजात वेदनेचा घेऊन हुंकार...

बाळ्या..
तू कधीच केला नाही
परिस्थितीचा बाऊ..
अन् पत्करली नाही हार  काळापुढे..

कारण
पुढच्या काळाला सांगायचं होतं
गुपीत यशाचं..
शून्यातून विश्व निर्माण करण्याचं अन् मर्म जगण्याचं..

म्हणून तू लढत गेलास
आहे त्या साधनांनी
छत्रपतीच्या वीर मावळयासम
जीवनाच्या महाभारतात
कृष्णा शिवाय...
कर्मण्येवाधिका मंत्राला समोर ठेवून..

म्हणून जिंकलास तू बाळ्या सायकल ॲम्ब्युलन्सवाला..

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**
**मो. 9403384889**
**(बाळ्या सायकल ॲम्बुलन्सवाला या कादंबरीवर आधारित)**

## फुलपाखरू

फुलांवर बसते
मनमोहक फुलपाखरू
आनंद फुलविते
निसर्गाचे लेकरू

मुक्त बागडतांना
दिसते सुंदर
सोनेरी नक्षी
नाजूक पंखावर

फुलांचा पिऊनी
गोड मकरंद
हवेत उडते
होऊनी धुंद

नाजूक पंख
चिमुकला जीव
ऊन -पाऊस लागता
येते मनी किव

हवेची झुळक
नेती जिकडे
पंख फडकवित
जाते तिकडे



**रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०६ नोव्हेंबर २०२५

# युद्ध, पर्यावरण आणि मानवता : शाश्वत शांततेची सामाजिक गरज

जगाच्या इतिहासावर नजर टाकली तर मानव सभ्यतेच्या प्रगतीसोबतच युद्धाचा इतिहासही तितकाच प्राचीन आहे. परंतु या संघर्षांनी केवळ राष्ट्रांच्या सीमा बदलल्या नाहीत, तर पृथ्वीच्या पर्यावरणीय संतुलनावरही खोल आणि दीर्घकालीन परिणाम केले आहेत. युद्ध म्हणजे फक्त शस्त्रांचा, सत्तेचा आणि भूभागाचा संघर्ष नव्हे, तर तो मानव आणि निसर्ग यांच्या नात्याचा विध्वंस करणारा एक सामाजिक आणि पर्यावरणीय आपत्तीचा प्रकार आहे. म्हणूनच 6 नोव्हेंबर हा दिवस जगभर 'युद्ध आणि सशस्त्र संघर्षांमध्ये पर्यावरणाच्या शोषणास प्रतिबंध करण्याचा आंतरराष्ट्रीय दिन (International Day for Preventing the Exploitation of the Environment in War and Armed Conflict)' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने 2001 साली हा दिवस घोषित केला, ज्याचा उद्देश युद्धकाळातील आणि त्यानंतरच्या काळातील पर्यावरणीय नुकसानावर जागतिक समाजाचे लक्ष वेधणे हा आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास, युद्ध हे केवळ राजकीय घटना नसून मानवी मूल्यांच्या पतनाचे आणि सामाजिक समतोल बिघडण्याचे प्रतीक आहे. समाजाचे आर्थिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय आणि मानवी पैलू हे परस्परांवर अवलंबून असतात. जेव्हा समाज सत्ता, भूभाग आणि संसाधनांवरील ताब्यासाठी युद्धाच्या मार्गावर जातो, तेव्हा या सर्व घटकांमध्ये असलेले नाजूक संतुलन तुटते. युद्धकाळात होणारे पर्यावरणीय नुकसान हे या असंतुलनाचे सर्वात गंभीर आणि दीर्घकालीन रूप आहे. उदाहरणार्थ, दुसरे महायुद्ध संपल्यानंतर जर्मनी, जपान आणि इतर देशांमधील औद्योगिक केंद्रे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली; रासायनिक व किरणोत्सर्गी प्रदूषणामुळे माती व पाण्याचे शेकडो वर्षांसाठी नुकसान झाले. हिरोशिमा आणि नागासाकीवरील अणुबॉम्बच्या स्फोटाने लाखो लोकांचे प्राण घेतले, पण त्याचबरोबर पर्यावरणावर निर्माण झालेला किरणोत्सर्ग आजही त्या प्रदेशातील आरोग्य, शेती आणि जैवविविधतेवर परिणाम करतो आहे.

पर्यावरण म्हणजे केवळ जंगल, पाणी, जमीन किंवा प्राणी नाही, तर ते समाजाच्या अस्तित्वाशी आणि विकासाशी निगडित असलेले जीवनाचे अधिष्ठान आहे. जेव्हा युद्धकाळात नैसर्गिक संसाधनांचा वापर शस्त्र म्हणून केला जातो किंवा पर्यावरणाचा नाश केला जातो, तेव्हा समाजाच्या भविष्यातील जीवनाधारालाच धोका निर्माण होतो. 1991 मधील आखाती युद्धात इराकी सैन्याने कुवैतमधील तेलविहिरींना आग लावली, ज्यामुळे लाखो टन धूर आणि विषारी वायू वातावरणात पसरले. पाण्याचे स्रोत दूषित झाले, जमिनीची सुपीकता कमी झाली, आणि अनेक प्राण्यांचे अधिवास नष्ट झाले. या घटनेने जगाला पुन्हा एकदा दाखवून दिले की युद्ध केवळ मानवी मृत्यूच नव्हे तर पर्यावरणीय विनाशाचाही मार्ग आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालानुसार, गेल्या 60 वर्षांतील सुमारे 40 टक्के अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय युद्धे नैसर्गिक संसाधनांच्या ताब्यासाठी झाली आहेत. पाणी, तेल, सोने, हिरा, लाकूड आणि जमीन यांसारख्या संपत्तीवर हक्क मिळवण्यासाठी अनेक राष्ट्रांनी हिंसात्मक मार्ग अवलंबला. या संघर्षांमुळे केवळ मानवाची हानी झाली नाही, तर संपूर्ण परिसंस्थांचे अस्तित्व धोक्यात आले. युद्धकाळात जंगलतोड मोठ्या प्रमाणात केली जाते, खाणींचे अंधाधुंद उत्खनन होते, नद्यांमध्ये रासायनिक द्रव्ये मिसळली जातात, आणि प्रदूषणाचा स्तर अनेक पटींनी वाढतो. अशा प्रकारे, युद्ध पर्यावरणीय असमानतेचे आणि हवामानबदलाचे एक महत्त्वाचे कारण ठरते.

समाजशास्त्रीय नजरेतून पाहिल्यास, युद्धाचा पर्यावरणावर परिणाम हा फक्त भौतिक नाशापुरता मर्यादित नसतो. तो समाजाच्या मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक रचनेवरही खोल परिणाम करतो. जेव्हा एखाद्या प्रदेशाचे पर्यावरण उद्ध्वस्त होते, तेव्हा तेथील लोकांना आपली उपजीविका सोडून स्थलांतर करावे लागते. यामुळे 'पर्यावरणीय निर्वासित' किंवा 'इको-रिफ्युजी' नावाचा नवीन सामाजिक वर्ग निर्माण होतो. या स्थलांतरामुळे इतर भागांमध्ये लोकसंख्येचा ताण वाढतो, अन्नसंकट निर्माण होते, आणि सामाजिक संघर्ष निर्माण होतात. त्यामुळे पर्यावरणाचा नाश हा अखेरीस मानवी समाजाच्या एकात्मतेलाच धक्का देतो.

युद्धकाळातील पर्यावरणीय हानीचा आणखी एक गंभीर पैलू म्हणजे लिंगाधारित विषमता होय. संघर्षाच्या काळात महिलांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो. पुरुष युद्धात सहभागी असल्याने घराची जबाबदारी, अन्न-पाण्याची तजवीज आणि मुलांचे संरक्षण यांचा भार महिलांवर येतो. युद्धामुळे पाणी व इंधनाच्या स्रोतांचे नुकसान झाल्याने महिलांना लांब अंतर चालत जावे लागते. यामुळे त्यांच्या आरोग्यावर आणि सुरक्षेवर परिणाम होतो. शिवाय, युद्धकाळातील दारिद्र्य आणि संसाधनांची टंचाई यामुळे महिलांवर अत्याचार, लैंगिक हिंसा आणि जबरदस्तीच्या कामाचे प्रमाण वाढते. त्यामुळे पर्यावरणाचे शोषण आणि महिलांचे शोषण हे युद्धकाळात एकमेकांशी जोडलेले असते.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण कार्यक्रमानुसार (UNEP), युद्ध संपल्यानंतरच्या काळात पर्यावरणाचे पुनर्वसन करणे हे शांततेच्या प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे. युद्धोत्तर काळात पर्यावरणीय पुनर्बांधणी न केल्यास समाजात पुन्हा संघर्षाचे बीज पेरले जाते. त्यामुळे 'ग्रीन पीस' आणि 'यूएनईपी' सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी युद्धग्रस्त भागांमध्ये पर्यावरणीय स्थिरता निर्माण करण्यासाठी विशेष उपक्रम सुरू केले आहेत. हे उपक्रम केवळ पुनर्वसनापुरते नसून शाश्वत विकासाला गती देणारे आहेत.

भारतीय परंपरेत निसर्ग हा देवतासमान मानला गेला आहे. "पृथ्वी ही माता आहे आणि आपण तिचे पुत्र आहोत" अशी भावना भारतीय संस्कृतीत रुजलेली आहे. महात्मा गांधींनी सांगितले होते की, "पृथ्वी प्रत्येकाच्या गरजा भागवू शकते, पण कोणाच्याही लोभासाठी नाही." हीच विचारसरणी युद्धोत्तर जगासाठी मार्गदर्शक ठरते. भारताने नेहमीच शांततेचा आणि अहिंसेचा संदेश दिला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये (Sustainable Development Goals) भारताने पर्यावरणीय समतोल, हवामान कृती, आणि सामाजिक न्याय या तीन मूलभूत तत्त्वांना केंद्रस्थानी ठेवले आहे.

समाजशास्त्र आपल्याला शिकवते की कोणतीही सामाजिक समस्या ही एकटी नसते; ती विविध घटकांशी गुंफलेली असते. युद्ध आणि पर्यावरणीय संकट हेदेखील तसेच परस्परसंबंधित विषय आहेत. युद्ध हा केवळ राजकीय प्रश्न नाही, तर तो सामाजिक असमानता, आर्थिक विषमता, आणि सांस्कृतिक अविश्वास यांचे मूळ आहे. जेव्हा समाजात शाश्वत विकास, सामाजिक न्याय, आणि पर्यावरणीय समता या मूल्यांचा अभाव असतो, तेव्हा युद्ध अपरिहार्य बनते. म्हणूनच युद्ध रोखण्यासाठी पर्यावरणसंवर्धन आणि सामाजिक समता या दोन्ही गोष्टींना समान प्राधान्य देणे आवश्यक आहे.

आजच्या घडीला हवामानबदल, पाण्याची टंचाई, प्रदूषण आणि संसाधनांची टंचाई या जागतिक समस्या आहेत. जर या समस्यांकडे दुर्लक्ष झाले, तर भविष्यकाळात युद्धाचे नवे कारण ही पर्यावरणीय असमानता असेल. म्हणूनच 6 नोव्हेंबरचा हा दिवस आपल्याला फक्त भूतकाळातील चुकांची जाणीव करून देत नाही, तर भविष्यातील धोकेही दाखवतो. युद्धकाळातील पर्यावरणाचे रक्षण करणे म्हणजे मानवतेचे रक्षण करणे होय.

शांतता आणि पर्यावरण हे एकमेकांचे पर्याय नाहीत, तर परस्पर पूरक आहेत. जेव्हा समाज पर्यावरणाशी सुसंवाद साधतो, तेव्हाच तो खऱ्या अर्थाने शांततेच्या दिशेने वाटचाल करतो. म्हणूनच आजच्या पिढीसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे "हिरवी शांतता संस्कृती" निर्माण करणे — अशी संस्कृती जी पर्यावरण, मानवता आणि समाज यांना समान महत्त्व देईल. शिक्षण, माध्यमे, समाजसंस्था आणि शासन यांच्या समन्वयातून पर्यावरणपूरक जीवनशैली, पुनर्निर्मित उर्जा, आणि संसाधनांचे शाश्वत वापर यांची सवय लावणे ही काळाची गरज आहे.

शेवटी, युद्ध आणि पर्यावरण यांच्यातील नाते समजून घेणे म्हणजेच मानवतेच्या भविष्यासाठी जबाबदारी स्वीकारणे होय. युद्ध जिंकणारे राष्ट्र कधीही खरे विजेते नसते; खरे विजेते तेच जे आपल्या भूमीचे, आपल्या समाजाचे आणि आपल्या पर्यावरणाचे रक्षण करतात. म्हणूनच हा 6 नोव्हेंबरचा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की 'शांती म्हणजे फक्त युद्धाचा अभाव नाही, तर पर्यावरणीय संतुलनाचा सन्मान आहे.'

'पृथ्वी आपली मालकी नाही, आपण तिचे पालक आहोत, तिचे रक्षण करणे हीच खरी देशभक्ती आहे.'



**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**
मो. 9960103582,
bagate.rajendra५@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002